**<u>ठळक बातम्या</u>**

- राफेल मरीन प्रकारच्या २६ लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी आज भारताचा फ्रान्सबरोबर संरक्षण करार

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या वार्तांकनसंदर्भात भारत सरकारने १६ पाकिस्तानी यूट्यूब वाहिन्यांवर घातली बंदी

- पहलगाम हल्ल्याच्या निषेधासाठी जम्मू काश्मीर विधानसभेचं आज विशेष अधिवेशन

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण

**आणि**

- आशियाई योगासन स्पर्धेत ८३ सुवर्ण पदकं मिळवून भारत सर्वोच्च स्थानावर

**<><><><><>**

केंद्र सरकार राफेल मरीन प्रकारच्या २६ लढाऊ विमानांची खरेदी करणार असून त्यासाठी आज फ्रान्सबरोबर संरक्षण करार होणार आहे. संरक्षण मंत्रालयाचे अधिकारी आणि भारतातले फ्रेंच राजदूत यांच्या उपस्थितीत संरक्षण करारावर स्वाक्षऱ्या होतील. भारताचे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह हे भारताचं प्रतिनिधित्व करतील. या २६ विमानांपैकी २२ सिंगल सीटर प्रकारची तर ४ डबल सीटर प्रकाराची विमानं आहेत. भारतीय नौदलाच्या गरजेनुसार या विमानांची रचना असेल. ही विमानं भारतीय नौदलाच्या विक्रांत आणि विक्रमादित्य या युद्धनौकांवर तैनात केली जातील.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत त्यांच्यामध्ये सुमारे ४० मिनिटं चर्चा झाली.

संयुक्त सुरक्षा दलांचे प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी काल संरक्षण मंत्र्यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन दहशतवादी हल्ल्यानंतर लष्कराने उचललेल्या पावलांची माहिती दिली होती. या भेटीत सीमा सुरक्षा दलाचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान भारतीय नौसेनेने जहाजरोधी क्षेपणास्त्र हल्ल्याचा सराव पूर्ण केला असून देशाच्या रक्षणासाठी सज्ज असल्याचं दर्शवलं आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेच्या भागात पाकिस्तानी सैन्यानं काल रात्री केलेल्या गोळीबाराला भारतीय सैन्यानं चोख प्रत्युत्तर दिलं. कुपवाडा आणि पूंछ भागातील नियंत्रण रेषेवर असलेल्या पाकिस्तानी सैन्याच्या चौक्यांमधून रात्री अचानक गोळीबार सुरू करण्यात आला. त्याला भारतीय सैनिकांनी तत्काळ आणि प्रभावी प्रत्युत्तर दिल्याचं संरक्षण खात्याच्या सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने १६ पाकिस्तानी यू ट्यूब वाहिन्यांवर बंदी घातली आहे. डॉन न्यूज, एरी न्यूज, आणि जिओ न्यूज या वाहिन्यांचा त्यात समावेश आहे. भारत, भारतीय सैन्य आणि सुरक्षा यंत्रणांबद्दल प्रक्षोभक, खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली. या वाहिन्यांचे एकूण सहा कोटीहून अधिक नोंदणीकृत प्रेक्षक आहेत. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत बीबीसीच्या वार्तांकनावरही सरकारने आक्षेप घेतला आहे. बीबीसीच्या बातम्यांमधे पहलगामच्या हल्लेखोरांचा उल्लेख टेररिस्ट अर्थात दहशतवादी असा न करता मिलिटन्ट्स म्हणजे सशस्त्र क्रांतिकारक असा करण्यात आला होता. तो बदलून या दहशतवाद्यांना दहशतवादी

असं संबोधलं जावं, अशा आशयाचं पत्र केंद्र सरकारने बीबीसीच्या प्रमुखांना पाठवलं आहे.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर तात्पुरत्या व्हिजावर राहणाऱ्या १७ पाकिस्तानी नागरिकांना मुंबई पोलिसांनी परत पाठवलं आहे. हे सर्वजण पर्यटक आणि वैद्यकीय व्हिजावर आले होते. यापैकी ज्यांच्यावर उपचार सुरू आहेत, त्यांना परतण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी २९ एप्रिलपर्यंतचा वेळ देण्यात आली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयानेही त्या भागात तात्पुरत्या व्हिजावर राहात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांवर नजर ठेवायचे निर्देश स्थानिक अधिकाऱ्यांना दिले आहेत. असे १७ पाकिस्तानी नागरिक उल्हासनगर भागात राहात असून त्यांना परत जाण्यासाठी दिलेली मुदत आज संपणार आहे. नवी मुंबई पोलिसांनी २०० पाकिस्तानी नागरिकांच्या कागदपत्रांची छाननी सुरू केली असून तात्पुरत्या व्हिजावर आलेल्या तिघांना परत पाठवलं आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार नवी मुंबईत २२९ पाकिस्तानी नागरिक दीर्घकालीन व्हिजावर राहात आहेत किंवा हा व्हिजा मंजूर व्हायची वाट बघत आहेत.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू काश्मीर विधानसभेचं विशेष अधिवेशन आज भरलं आहे. कामकाज सुरु करण्यापूर्वी सभागृहाने या हल्ल्यात मरण पावलेल्यांना दोन मिनिटं मौन पाळून आदरांजली वाहिली. अध्यक्ष अब्दुल रहीम राथर यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला. उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी यांनी निषेधाचा ठराव मांडला असून त्यावर चर्चा सुरु आहे. या भयानक हल्ल्यामुळे आपण व्यथित असून मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांची माफी मागत असल्याचं मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला यांनी चर्चेदरम्यान सांगितलं. काश्मीरमधे

आलेल्या पर्यटकांना सुरक्षित माघारी पाठवण्याची जबाबदारी आपली होती असं ते म्हणाले.

या भयानक हल्ल्यानंतर विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाने केली होती. त्यानुसार नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी हे अधिवेशन बोलावलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात पद्म पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी सरकारनं १३९ जणांना पद्म पुरस्कार जाहीर केले होते. त्यामध्ये ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या नामवंतांमध्ये प्रख्यात व्हायोलिनवादक आणि संगीतकार डॉक्टर एल सुब्रमण्यम, यांचा समावेश आहे. ख्यातनाम संपादक तसंच प्रसार भारतीचे माजी अध्यक्ष ए. सूर्यप्रकाश, चित्रपट अभिनेते अनंत नाग, नंदमुरी बालकृष्ण आणि एस. अजित कुमार यांना पद्मभूषण सन्मान जाहीर झाला आहे. पद्मश्री सन्मानप्राप्त मान्यवरांमधे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, चित्रकार वासुदेव कामत, सुलेखनकार अच्युत पालव, शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे- देशपांडे यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

दिल्लीमध्ये काल झालेल्या आशियाई योगासन अजिंक्यपद स्पर्धांमध्ये भारतानं निर्विवाद वर्चस्व राखत ८३ सुवर्ण पदकांची कमाई केली. दुसरं स्थान मिळवणाऱ्या जपानच्या खात्यात ३ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कास्यपदकं जमा झाली. मोंगोलिया, ओमान आणि नेपाळच्या संघांनी पहिल्या पाचात स्थान मिळवलं. २१ देशांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

**<><><><><>**

आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, पश्चिम बंगालच्या काही भागात आणि केरळमध्ये तुरळक ठिकाणी आज मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राजस्थान, पंजाब आणि हरियाणा सोडून देशाच्या सर्व भागांमध्ये तापमान सामान्य किंवा थोडंफार अधिक राहण्याची शक्यता असून नवीदिल्लीत १ मे पासून वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**झारखंड**मधल्या अनेक भागांसाठी आज हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जारी केला असून येत्या १ मे पर्यंत वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

**हिमाचल प्रदेशा**त उष्णतेचा प्रकोप सुरु असून तापमान २ ते ५ डिग्री सेल्सिअस पर्यंत वाढलं आहे. येत्या १ मे पर्यंत ही उष्णलहर सुरु राहणार असून नागरिकांनी काळजी घेण्याचं आवाहन हवामान विभागाने केलं आहे. **छत्तीसगढ**च्या अनेक भागांमध्ये काल रात्री पडलेल्या पावसामुळे नागरिकांना उन्हाळ्यातून दिलासा मिळाला आहे. काही भागांमध्ये आजदेखील पाऊस किंवा गारा पडण्याची शक्यता असल्यामुळे हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला केला आहे.

**जम्मू आणि काश्मीर**मध्ये येत्या १ मे पर्यंत हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून २ आणि ३ मे ला वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागाने सांगितली आहे. जम्मू भागात उष्णलहरींची शक्यता असून नागरिकांनी दुपारच्या वेळात घराबाहेर पडणं टाळण्याचं आवाहन हवामान विभागाने केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज जयपूर इथे राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार आहे. सवाई मानसिंग मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल. मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या कालच्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं लखनौ सुपर जायंट्स संघावर ५४

धावांनी मात केली. मुंबई इंडियन्स संघानं ठेवलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौ सुपर जायंट्स संघ १६१ धावाच करू शकला.

**<><><><><>**

नवी दिल्लीत आज दिल्लीकरांसाठीच्या आयुष्मान वय वंदना कार्ड योजनेची सुरुवात केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते झाली. या योजनेत ७० वर्षं आणि त्यापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकांना ५ लाख रुपयांचं मोफत आरोग्य विमा कवच मिळणार आहे. तसंच, यापूर्वी आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य विमा कवच मिळालेल्या ७० वर्षं आणि त्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या नागरिकांना दरवर्षी ५ वर्षांचं अतिरिक्त विमा कवचही मिळणार आहे.

**//<><><><><>//**